# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in / jtdire.1115@gmail.com Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र. विससं/उशि/कोविप/२०१८/1685 दि.११.०७.२०१८

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित कला,

वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,

जि.ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषय: अर्जित रजा रोखीकरणाचे प्रस्ताव सादर करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन सूचित करण्यात येते की, आपले महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे अर्जित रजा रोखीकरणाचे प्रस्ताव सादर करतेवेळी सोबत जोडलेल्या विहित नमून्यातच प्रमाणपत्रे / हमीपत्रे आपले महाविद्यालयाचे Letterhead वर सादर करण्यात यावीत, जेणेकरुन प्रस्ताव सादरीकरणामध्ये एक वाक्यता राहील. तसेच सर्व प्रमाणपत्रे / हमीपत्रे खालील क्रमानेच स्वतंत्र फाईल तयार करुन सादर करावीत.

१. महाविद्यालयाचे मागणी पत्र.
२. Calculation Sheet
३. महाविद्यालय / संस्थेच्या ठरावाची छायांकित प्रत
४. कार्यालयीन मंजूरी आदेश (प्राचार्यांचे आदेश या कार्यालयाचे स्तरावर निर्गमित केले जातील).
५. अंतिम वेतन प्रमाणपत्र / अंतिम वेतन चिठ्ठी
६. ना-देय / ना-चौकशी प्रमाणपत्र
७. अतिप्रदानाबाबतचे महाविद्यालयाचे हमीपत्र (मूळ प्रत)
८. अतिप्रदानाबाबतचे कर्मचा-याचे हमीपत्र (छायांकीत प्रत प्राचार्यांचे प्रतिस्वाक्षरीने)
९. सेवापुस्तकामधील पहिल्या पान व अर्जित रजेच्या हिशोबाची छायांकित प्रत (सुस्पष्ट दिसेल अशी प्राचार्यांचे प्रतिस्वाक्षरीने प्रमाणित असणे आवश्यक)
१०. कर्मचारी मयत झाला असल्यास मृत्यु दाखला व कर्मचाऱ्याने घोषित केलेले वारसाचे प्रमाणपत्र. (छायांकीत प्रत प्राचार्यांचे प्रतिस्वाक्षरीने)

RBLosled 11/7/18

विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

# अर्जित रजा रोखीकरणाचे परीगणना पत्रक (Calculation Sheet)

| कर्मचा-याचे संपूर्ण नाव | एचटीई सेवार्थ आयडी | सेवा निवृत्तीचा दिनांक | निवृत्तीच्या दिनांकाला असलेले मूळ वेतन | ग्रेड पे | महागाई भत्ता दर % | महागाई भत्ता | एकुण वेतन (४+५+७) | अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम<br><br>(रकाना ८ मधील रक्कम गुणिले शिल्लक अर्जित रजा भागिले ३०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

प्राचार्य,
(स्वाक्षरी व रबरी शिक्का)

**कार्यालयीन आदेश**

विषयः **अर्जित रजा रोखीकरण मंजूरीबाबत...**

संदर्भः १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि सेवा योजन विभागाचे शासन निर्णय क्र.युएसजी. १२९४/२९२१अ/विशी-४, दि.२९ मार्च १९९७

२. वित्त विभाग शासन निर्णय क्र.अरजा२४०१/८/सेवा-९, दि.१५ जानेवारी २००१.

प्रस्तूत महाविद्यालयातील कर्मचारी श्री./श्रीम. ______________________________, पदनाम ______________ हे दि. ___________ रोजी नियत वयोमानाने / स्वेच्छा निवृत्तीने सेवानिवृत्त / मयत झाले आहेत. त्यांच्या सेवापटातील रजेच्या नोंदीनुसार त्यांच्या रजा खाती एकूण ______ दिवसांची अर्जित रजा शिल्लक आहे. उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील परिच्छेद क्र.२ मधील मार्गदर्शक तरतुदीनुसार ३०० दिवस इतक्या मर्यादेत गणना करण्यात येऊन सदर _____ दिवसांची अर्जित रजा साठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

तरी उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना तसेच "महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम-१९८१" नियम ५२, ५४ आणि ६८ मधील विहित केलेल्या तरतूदीनुसार त्यांचे मूळ सेवापुस्तकातील नोंदी आणि रजा अभिलेख्यानुसार त्यांच्या अर्जित रजा खाती शिल्लक असलेल्या _____ दिवसांच्या अर्जित रजेच्या रोखीकरणासाठी प्रचलित दरानुसार अनुज्ञेय होत असलेली रक्कम रु. ______________/- इतक्या रक्कमेस मा.विभागींय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचे मान्यतेच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

प्राचार्य,<br>
(स्वाक्षरी व रबरी शिक्का)

# ना विभागीय चौकशी व ना मागणी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीम. ______________________________________,

हे/या प्रस्तूत महाविद्यालयामध्ये दि. ______________ पासून ______________ या पदावर कार्यरत होते/होत्या. तरी आजपर्यंत त्यांचेविरुध्द कोणतीही विभागीय अथवा न्यायालयीन चौकशी प्रलंबित नसून त्यांचेकडे कोणत्याही शासकीय रक्कमांची वसूली करावयाची शिल्लक नाही.

स्थळ:
दिनांक:

प्राचार्य,
(स्वाक्षरी व रबरी शिक्का)

# हमीपत्र

हमीपत्र सादर करण्यात येते की, आमचे महाविद्यालयातील श्री./श्रीम. ____________________ ____________________, पदनाम ________________ यांच्या अर्जित रजा खाती शिल्लक असलेल्या एकूण _____ दिवसांच्या रजा रोखीकरणाच्या रक्कमेचे अतिप्रदान झाल्यास ती अतिप्रदानाची रक्कम एकरकमी परत करण्याची जबाबदारी प्रस्तूत महाविद्यालयाची राहील. तसेच जर कदाचित काही कारणास्तव श्री./श्रीम. ________________________________ यांचेकडून अतिप्रदानाची रक्कम परत होऊ शकली नाही तर ती रक्कम त्यांना देय असलेल्या इतर कोणत्याही शासकीय रक्कमेमधून वजावट करुन ती शासनास परत करण्यात येईल. अन्यथा सदरबाबत महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई होऊ शकते याची मला पूर्णत: जाणीव आहे.

स्थळ:<br>
दिनांक:

प्राचार्य,<br>
(स्वाक्षरी व रबरी शिक्का)

# हमीपत्र

मी खाली सही करणार, श्री./श्रीम. ______________________________,

राहणार, ________________ हमीपत्र सादर करतो की, माझ्या अर्जित रजा खाती शिल्लक असलेल्या एकूण _____ दिवसांच्या रजा रोखीकरणाची रक्कम अतिप्रदान झाल्यास ती अतिप्रदानाची रक्कम मी एकरकमी परत करेन. तसेच जर कदाचित काही कारणास्तव अतिप्रदानाची रक्कम परत न झाल्यास ती रक्कम मला देय असलेल्या इतर कोणत्याही शासकीय रक्कमेमधून वजावट करण्यास माझी संमती आहे. अन्यथा माझ्यावर दंडात्मक कारवाई होऊ शकते याची मला पूर्णतः जाणीव आहे. सदर हमीपत्र माझ्या वारसांनाही लागू राहील.

स्थळः
दिनांकः

(कर्मचाऱ्याची स्वाक्षरी)

यांचे समक्षः

१. ______________________

२. ______________________

(**सूचना** : या हमीपत्राची मूळ प्रत महाविद्यालयाकडे ठेवावी व फक्त छायांकीत प्रत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.)